# प्रेसनोट

दि.१०/०१/२०१८

कोंढवा पोलीस स्टेशन गु.रजि.नं. ५४१/२०१७ भादवि कलम ३८०,४२७ या दाखल गुन्हयाचा तपास मिळालेल्या माहीती नुसार, वपोनि श्री मिलिंद गायकवाड यांचे मार्गदर्शनाखाली निष्पन्न संशयीत इसम नामे दिलीप मोरे याचा शोध घेतला असता त्याने आपले साथीदार नामे (१) शिराज महम्मूद बेग जमादार वय ४१ वर्षे ,रा नवीन वैभवनगर झटपट कॉलनी,६क्रॉस ता.जि.बेळगावी,राज्य कर्नाटक (२) मोहीद्दीन जाफर बेग जमादार वय ५३ वर्षे, रा.वैभवनगर झटपट कॉलनी ता.जि.बेळगावी ,राज्य कर्नाटक (३) दादापीर मकदुमदार तहसिलदार वय ३८ वर्षे,रा.दरबारगल्ली,इनमादारचाळ,ता.जिल्हा बेळगांवी राज्य कर्नाटक, (४) मलीकजान कुतूबुद्दीन हनिकेरी वय ५२ वर्षे, रा विरभद्रनगर ७ वा क्रॉस,ता.जि.बेळगांवी राज्य कर्नाटक, यांचे मदतीने सदरचा गुन्हा केला असल्याची कबुली दिली. संशयीत दिलीप मोरे याने दिलेल्या माहीतीच्या आधारे त्याचे इतर चारही साथीदार यांना कोल्हापुर येथुन ताब्यात घेण्यात आले आहे. सदर ए.टी.एम. चोरीच्या गुन्हयातील मुख्यसुत्रधार दिलीप मोरे असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

चोरी करण्या पुर्वी सदर एटीएमची सर्व साथीदार मिळून परिसराची रेकी करुन मग चोरी करीत असत चोरी करण्यासाठी विशीष्ठ प्रकारचे स्कॉर्प्रिओ .गाडीमध्ये मॅकेनिझम यंत्रणा तयार करण्यात आली होती.सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये फोटो येऊ नये म्हणून सर्वप्रथम एटीएमच्या मधील कॅमेरे वायर कट करुन बनविण्यात आलेल्या मशीन व्दारे एटीएम अडीच मिनीटात स्कार्पीओ गाडीमध्ये घेत असत.

सदर आरोपींना दिनांक ९/१/२०१८ रोजी अटक करण्यात आली असून दिनांक २०/१/२०१८ पर्यत पोलीस कस्टडी रिमांड घेण्यात आलेली आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त, पुणेशहर, सह पोलीस आयुक्त, पुणेशहर सुचनेप्रमाणे व अपर पो.आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग पुणेशहर तसेच पोलीस उप आयुक्त,परिमंडळ-४, व सहा.पोलीस आयुक्त,वानवडी विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.मिलिंद गायकवाड व पोलीस निरीक्षक(गुन्हे) श्रीकांत शिंदे, पोउपनि श्री.संतोष शिंदे,पो.हवा.राजस शेख,संजय कदम, पो.ना.योगेश कुंभार, पृथ्वीराज पांडुळे, संजीव कळंबे, पो.शि अजीम शेख ,जगदीश पाटील,दिपक क्षिरसागर, उमाकांत स्वामी, आदर्श चव्हाण या अधिकारी व कर्मचारी यांनी यशस्वी केली आहे.


INDIA